M. S. Board Of Secondary And
Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi,
Navi Mumbai-४०० ७०३.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र. मुंविमं/माध्य.परीक्षा / 2487
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.
दिनांक:-31/05/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक,
मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नुंबई/बृन्हमुंबई/ठाणे/पालघर/रायगड.

विषय:—फेब्रु—मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या गुणपत्रिका तथा प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत.व जून—जुलै २०२६ परीक्षेमध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची प्रिलिस्ट स्विकारणे बाबत..

संदर्भ:—१.क्र. रा.मं/परीक्षा—३/१९६२/दिनांक .११/०५/२०२६
२. क्र.रा.मं/परीक्षा—२ /२२८६ /दिनांक ३०/०५/२०२६.

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की,राज्य मंडळ पुणे यांचे पत्र क्र. रा.मं/परीक्षा—२ / २२८६ / दि ३०/०५/२०२६ अन्वये फेब्रु—मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्रत्र (इ.१०वी) परीक्षेच्या गुणपत्रिका तथा प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप मुंबई विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त शाळांना सोमवार दि. ०१ /०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे. माध्यमिक शाळांनी त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिका तथा प्रमाणपत्राचे वाटप करावयाचे आहे.

संदर्भिय पत्र क्र.१ नुसार जून—जुलै २०२६ परीक्षेमध्ये प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांची प्रिलिस्ट, चलन त्याच दिवशी स्विकारण्यात येणार आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(माधुरी पाटोळे)
विभागीय सहा. सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३.

Telephone : २७६५२४४५,२७६६२५०४,२७८८१०७७,२७८८१०७५,२७८९९९८७ * Fax : २७६५९४९१/२७८८१३४९
Email : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
P.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए फा.प्लॉ.नं.१७८ १७९
ई बालभारती शेजारी आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे भांबुर्डा
शिवाजीनगर पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-२/२२८६
पुणे - ४११ ००४
दिनांक-30/०५/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप विभागीय मंडळांनी सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना **सोमवार दिनांक** ०१/०६ /२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करावयाचे असून माध्यमिक शाळांनी त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रक तथा प्रमाणपत्राचे वाटप करावयाचे आहे. त्यानुसार विभागीय मंडळ स्तरावर नियोजन करावे.

सदर बाब विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित माध्यमिक शाळांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(मा. अध्यक्ष, यांच्या मान्यतेने)

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी -
व्यवस्थापक,
गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे-०४

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

॥ प्रकटन ॥

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर दिनांक ०८ मे, २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना सोमवार दिनांक ०१/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार असून माध्यमिक शाळांमार्फत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रक तथा प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व माध्यमिक शाळांना सूचित करण्यात आलेले आहे.

या संदर्भात विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित मुख्याध्यापक/विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे -०४

दिनांक- 30/05/2026